राज्य सरोवर संवर्धन योजना - कागल, जि.कोल्हापूर येथील श्रीमंत जयसिंगराव तलावाच्या तलावाचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन,संरक्षण व सौंदर्यीकरणाच्या कामाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत तसेच अनुदान वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
पर्यावरण विभाग, मंत्रालय,
शासन निर्णय क्रमांकः रासयो २००७/६८६/प्र.क्र. ६०/ता.क. ३
नवीन प्रशासन भवन, १५वा मजला, मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांकः २३ जानेवारी २००९.

वाचा:- १) या विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय दिनांक २५ सप्टेंबर,२००७
२) कागल नगरपरिषद, कागल यांचे पत्र जावक क्र. १२१८/२००८-२००९ दिनांक ०२जानेवारी,०९

**प्रस्तावना:-** राज्यातील तलाव, सरोवर व मोठे जलाशय यांच्या पर्यावरणीयदृष्टया संवर्धनासाठी सरोवर संवर्धन योजना सन २००६-२००७ या वर्षापासून राज्यात सुरू करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने कागल येथील श्रीमंत जयसिंगराव तलावाच्या पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण व सौंदर्यीकरण कामाच्या एकूण रूपये २६०.४६ लाख एवढया रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी ७० टक्के हिस्सा रूपये १८२.३२ लाख एवढी रक्कम राज्य शासनाकडून तसेच ३० टक्के हिस्सा म्हणून रूपये ७८.१४ लाख नगर परिषद, कागल यांनी उपलब्ध करून द्यावयाची आहे. राज्य शासनाकडून द्यावयाच्या रूपये १८२.३२ लाख पैकी रूपये १००.००(अक्षरी रूपये शंभर लाख) नगरपरिषदेस संदर्भाधीन दिनांक २५ सप्टेंबर,२००७ च्या शासन निर्णयाव्दारे नगरपरिषदेस मुक्त करण्यात आले आहे. सदर निधीचा विनीयोग झाल्याचे कागल नगरपरिषद, कागल यांनी संदर्भाधीन दिनांक ०२जानेवारी,०९ च्या पत्राव्दारे कळविले आहे, व उर्वरित निधी मुक्त करण्याबाबत विनंती केली आहे. त्या अनुषंगाने उर्वरित निधी वितरीत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

सन २००८-०९ या आर्थिक वर्षात उपरोक्त कार्यक्रमांसाठी ३४३५, परिस्थितीकी व पर्यावरण या मुख्य लेखा शिर्षाखाली एकूण रूपये २५०.०० लाखाची तरतूद मंजूर आहे

**शासन निर्णयः-**

राज्य योजनांतर्गत योजनेतील राज्य सरोवर संवर्धन योजनेतंर्गत कागल शहरातील श्रीमंत जयसिंगराव तलावाच्या पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी एकूण रूपये २६०.४६ लाख मंजूर केले आहेत. त्यापैकी अनुज्ञेय राज्य हिस्सा रूपये १८२.३२ लाख पैकी रूपये १००.०० लाख निधी दिनांक २५ सप्टेंबर,२००७ च्या शासन निर्णयान्वये मुक्त करण्यात आला असून, आता या शासन निर्णयाव्दारे उर्वरित रूपये ८२.३२ लाख कागल नगरपरिषदेस वितरीत करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

अ. संदर्भाधीन दिनांक २५ सप्टेंबर,२००७ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट-ब येथील सर्व मार्गदर्शक तत्वे, अटी व शर्ती उपरोक्त रक्कमेतून घेण्यात येणा-या कामासाठी सुध्दा लागू राहतील.

ब. राज्य शासनाची प्रशासकीय मान्यात प्राप्त झाल्यानंतर, सदर कामांना महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाची तांत्रिक मान्यता प्राप्त करून घेण्यात यावी.

क. प्रत्येक टप्प्यातील कामांना पर्यावरण विभागाची मंजूरी घेण्यात यावी.

ड. नगरपरिषदेने या अगोदर राज्य हिस्सा म्हणून मुक्त निधीचा प्रमाणात नगरपरिषदेचा हिस्सा खर्च केल्यांनतरच उपरोक्त निधी खर्च करावा. त्याबाबत शासनाकडे उपयोगिता प्रामाणपत्र पाठवावे.

२.	यासाठी मुख्याधिकारी, कागल नगरपरिषद, कागल जिल्हा कोल्हापूर (CHIEF OFFICER, KAGAL NAGAR PARISHD, KAGAL) यांचे नावे रूपये ८२.३२ लाख एवढया निधीचा धनादेश काढण्यात यावा.

३	हा होणारा खर्च मागणी क्र. यू-४, ३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण -०४-प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण (१०३) वायु व जल प्रदुषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना, (०२)(०७) राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना- (३४३५ ०१ ८२), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतन्नेत्तर) या मुख्य लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व तो सन २००८-०९ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४.	हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक शा.नि.वि.वि.क्र.अंदाज १००८/प्र.क्र.१२५/२००८/अर्थसंकल्प-३ दिनांक २२.४.२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४.	सदर शासन निर्णय शासनाच्या सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www. maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०१३११२४७४३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(श्या.ना.धकाते)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा. मंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पर्यावरण), यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व हक्कदारी/लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-१६/ अर्थसंकल्प - ५, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हाधिकारी, कोल्हापूर
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोल्हापूर
मुख्याधिकारी,नगरपरिषद कागल, जि. कोल्हापूर.
निवड नस्ती, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.